क्रमांक : ४४४६ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १० मार्च, २०२१

संदर्भ :- १) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक क्र.३२२१/क-१, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१
२) या सचिवालयाचे परिपत्रक क्र. ३९३०/क-१, दिनांक ५ मार्च, २०२१

**:: कार्यालयीन आदेश ::**

बुधवार, दिनांक १० मार्च, २०२१ रोजी समाप्त होणाऱ्या विधानमंडळाच्या प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन कालावधीत या सचिवालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या अतिरिक्त कामाचा विचार करुन, या सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी यांना **शुक्रवार, दिनांक १२ मार्च, २०२१** रोजी सुट्टी देण्यात येत आहे.

RT-PCR कोरोना चाचणी करण्याच्या अनुषंगाने शनिवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२१ व रविवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२१ या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना तसेच शनिवार, दिनांक ६ मार्च, २०२१ व रविवार, दिनांक ७ मार्च, २०२१ या दोन दिवसांपैकी कोणत्याही एका दिवशी जे अधिकारी/कर्मचारी कार्यालयीन वेळेत उपस्थित होते अशा अधिकारी/कर्मचारी यांना उक्त दोन दिवसापैकी एका दिवसाची बदली सुट्टी (अशा एकूण ३ बदली सुट्ट्या) दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंत वरिष्ठांच्या पुर्वपरवानगीने उपभोगता येतील.

**दिनांक २७ व २८ फेब्रुवारी, २०२१ रोजी व दिनांक ६ व ७ मार्च, २०२१ रोजी कार्यालयात पूर्वपरवानगीने अनुपस्थित राहिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना RT-PCR कोरोना चाचणी करुन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच उक्त दिवशी परवानगीशिवाय अनुपस्थित राहिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. उपरोक्तप्रमाणे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय अनुपस्थित अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयात हजर करुन घेतले जाणार नाही.**

आदेशानुसार,
**( सुभाष नलावडे )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..२/-

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) सर्व मा.समिती प्रमुख यांचे कार्यालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी.

११) व्यवस्थापक उपहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१२) निवडनस्ती.

**प्रतिलिपी :-**

१) उप सचिव (श्रीमती मे.दि.तळेकर) व उप सचिव (श्री.रा.म.तारवी), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी सुट्टीच्या दिवशी सदस्यांच्या प्रवास भत्त्याची देयके व रेल्वे कूपन्स देण्याची व्यवस्था करावी.

२) अवर सचिव (श्री.र.ग.जगदाळे), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

३) कक्ष अधिकारी, ('ग-१' कक्ष), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

४) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक ('ग-२' कक्ष), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

५) कक्ष अधिकारी, 'ह' कक्ष (विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते आणि रेल्वे कुपन वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती व निवृत्तीवेतन), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**टीप :- शुक्रवार, दिनांक १२ मार्च, २०२१ रोजी कार्यालयीन कामाकरीता कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या 'ग-१' कक्ष, 'ग-२' कक्ष व 'ह' कक्षातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना त्या दिवसाची बदली सुट्टी त्यांच्या विनंतीनुसार देय राहील.**